# प्राचीन मराठी अप्रकाशित गद्यग्रंथ

## ( १ )

# शिवरामकृत पंचीकरण

॥ श्री ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुगणपत्यादि सर्वेष्ट देवताभ्यो नमः ॥ ओं सच्चिदानंदरूपाय सर्वाधीष्टाचिसाक्षिणे नमो वेदांतवेद्याय गुरवेनंतमूर्तये ॥ १ ॥ अथपंचीकरणप्रारंभः ॥ कोणि येक शिष्य साधनचतुष्टयसंपन्न होउनि सद्गुरूसी शरण गेला ॥ तरि ते च्यारि साधने कोणतीं नित्यानित्यविवेक ॥ १ ॥ इहामुत्रफलभोगविराग ॥ २ ॥ शमादिषट्क ॥ ३ ॥ मुमुक्षता ॥ ४ ॥ ऐसीं च्यारि साधने ॥ तरि नित्यानित्यविवेक ह्मणजे कांय ॥ नित्य आत्मा ॥ अनित्य ह्मणिजे देहादि प्रपंच ॥ अतां विवेक ह्मणिजे आत्म्याकडे पाहणे ॥ देहादि प्रपंची उदास होणे या नाव नित्यानित्यविवेक ॥ हे प्रथम साधन ॥ आतां दुसरें साधन इहामुत्रफलभोगविराग ह्मणिजे काय इह ह्मणिजे राज्यादि संपदिचे सुख ॥ अमुत्र ह्मणिजे स्वर्गलोकवैकुंठ सत्य लोक कैलासादिक या दोन्ही लोकीं विषय तत्समानेची प्रत्यक्षानुमाने जाणून विट धरणे ॥ या नाव इहामुत्रफलभोगविराग हे दुसरे साधन ॥ शमादिषट्क मणिजे काय शम दम तितिक्षा उपरति श्रध्या समाधान ६ असे हे साहा मिळोन येक साधन येक साधन शम म्हणिजे दुष्ट वासनेपासुन मन फिरवणे या नाव शम ॥ दम म्हणिजे शब्दादि दृश्य विषयापासुन श्रोत्रादि इंद्रियें अवर्णे या नाव दम॥ तितिक्षा अन्यायविण अपले किंवा इतर लोकि जाचिले तो जाच क्षोभोर्मी न उठता अंगी साहणे या नाव तितिक्षा ॥ आतां उपरति म्हणिजे मन दुष्ट वासनेंपासाव फिरउन भगवच्चणि ठेवणे ॥ इंद्रियें जे ते हि दृश्य विषयापासाव अवरून भगवद्भजनी लाविले मग त्या मन आणि इंद्रियासी दृश्य विषय आवडेनासे जाले अखंड भगवद्भजनी च रमू लागले ॥ या नाव उपरती ॥ आतां श्रद्धा म्हणजे ॥ जे सद्गुरुनी सांगितलें तें वेदवाक्य सत्य मानून गुरुवेदवाक्यवचनी विश्वास ठेउन आत्मरूप अनुभवणे या नाव श्रद्धा ॥ अतां समाधान म्हणजे प्राचीन कर्मयोगें ज्या समई हर्षविषादादि होतें तेव्हा धैर्यबळें मन ढमळेना या नाव समाधान ॥ ऐसी शम दम तितिक्षा उपरति श्रद्धा समाधान शमादिषट्क ॥ आतां मुमुक्षता म्हणजे जन्म-मरणावेगळा कधीं होयीन आत्माराम कधीं पाहीन तो दाखवी ऐसा सद्गुरु कधीं भेटेल ॥ ऐसा अनुताप रात्रंदिवस झुरणे या नाव मुमुक्षु हें चौथें साधन येणेपरी तो शिष्य चहुं साधनी संपन्न होउन सद्गुरूसीं धुंडित आलिला ॥ तो

त्याच्या अपर पुण्याच्या राशी फळासि आल्या ॥ पूर्वी निष्काम कर्मे ईश्वरार्पण केली होती ह्मणूनी त्या ईश्वरासी कृपा आली ॥ ऋण फेडावया सद्गुरुरूपें प्रत्यक्ष प्रगट जाहाला ततक्षणी शिष्याने साष्टांग नमस्कार केला ॥ तेव्हां स्वामी म्हणूं लागले कीं बापा तुज कवणे गांजिलें ॥ कां कष्ट झाले ॥ ते सांग ऐसे पुसतां शिष्या म्हणे स्वामी मि त्रिविध तापें फार तापलों ॥ सुखदुखें फार जाचलो ॥ तरी ते त्रिविध ताप कोणते ॥ अध्यात्मिक ॥ अधिदैविक ॥ अधिभौतिक ॥३॥ अध्यात्मिक म्हणजे ॥ अंतःकरणी ग्रहदाराची चिंता वाहणे तेकरिता मन समाधान नाही अखंड काम क्रोध राग द्वेष उठो लागले त्यास्तव सुखदुखि होणे ॥ हा अध्यात्मिक ताप ॥ अधिदैविक म्हणजे ॥ दैवी पर्जन्यादि नाही म्हणून दुष्काळ पडला ॥ किंवा फार पर्जन्य झाला तेणेकारितां दुष्काळ खावयाशी अन्न नाहीसे जाले अथवा तो देव हा देव राखाया जोखाया नवग्रहादि पीडा जाहालि म्हणउनि सुखदुखी होणे हा अधिदैविक ताप ॥ अधिभौतिक म्हणिजे काय ॥ शरीराचे ठायीं शीतज्वरादिक व्याधीचि पीडा होऊ लागली तेणेकरिता अत्यंत आहळलो ॥ हा अधिभौतिक ताप ॥ ऐसा त्रिविध तापे तापलो जन्ममरणाशी बाज आलो ॥ तरि या त्रिविध तापाशी उपशम न होय ॥ जन्म ममरणानुरूप संसारसागर तरेन आणी अंगे देव पाहेन ऐसे स्वामीने दया मजवर करावे ह्मणूनि मागुती चरणाशि लागलो तेव्ह तो स्वामी कृपेचा सागर करुणेने द्रवला मग त्यासी उष्टउनी सन्मुख बैसवुन बोलता जाला ॥ बापा हे त्वंपदाचे शोधन आणि जड चैतन्याचा निवाडा हे कळल्या वेगळा तुज देव दिसेना अणि मोक्ष हि होईना तरि स्वामि त्वंत्पदाचे शोधन आणि चैतन्याचे शोधन निवाडा म्हणिजे काय ॥ तरि ऐक बापा जड म्हणिजे अपणाशि नेणे दुसर्यांशि नेणे ॥ या नाव जड ॥ आता चैतन्य ह्मणिजे आपणाशि जाणिजे ॥ दुसर्यांसि जाणे या नाव चैतन्य तो चि देव कळला ह्मणजे प्रत्यक्ष मोक्ष ॥ तरि स्वामी अपणासि नेणे दुसऱ्यांसि नेणे ॥ ते जड ॥ अपणासि जाणे दुसर्यांसि जाणे ते चैतन्य सागितले तेकरिता मज काय जाले ॥ तेव्ह स्वामी ह्मणतेत तु कोण आहेस ते साग ॥ तरि स्वामी मि दगडोबा धोंडोबा रामकृष्ण नामाचा तरि बापा हे नाम कशासि अले ॥ तरि स्वामिया देहासि नाव अले तरि हा देहे। मि देहे ऐसे जाणेना दुसरयास तरि नेणे जी तरि जे आपणासि नेणे दुसऱ्यासि नेणे ते काय ते जड तेव्हा देह जड कि आणि कमडल कि भुताचे घडले। कि दृश्य ह्मणजे जे जे दिसते त्यासि दृश्य ह्मणावे तेव्हा देह दिसतो की हाडामासाने गुडाळले भुताचे फटकाळ॥ तरि तु ह्मणसि भुताचे कैशे भुते ते कोणति तरि ऐक सागो ॥ पृथ्वी ॥ अप ॥ तेज ॥ वायु ॥ आकाश ॥ अैशे हे पंच भुते ॥ आता त्याचे विकार सागतो ऐक ॥ श्रा ॥ ७ ॥ श्री

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पृथिवि | आप | तेज | वायु | आकाश | माहाभुते | कर्ता | प्राण | ज्ञानेद्रीये | करमेदीय | विषय |
| आस्ति | काळ | क्षुधा | चलन | काम | आकाश | अंतःकरण | व्यान | श्रोत्र | वाचा | शब्द |
| मांस | मुत्र | त्रिषा | वळण | क्रोध | वायु | मन | समान | त्वचा | पाणि | स्पर्श |
| त्वचा | मज्जा | निद्रा | धावण | शोक | तेज | बुद्धि | उदान | चक्षु | पाद | रूप |
| नाडी | रेत | आलस्य | प्रसरण | मोह | आप | चित्त | प्राण | जिव्हा | शिश्न | रस |
| रोम | रक्त | मैथुन | आकोचन | भय | पृथिवि | अहंकार | आपान | घ्राण | गुद | गंध |
| | | | | | ५ | आकाशांश | वायव्यांश | तेजांश | आपांश | पृथिव्यांश |

ऐसे मिळूनि भूतपचकाच्या पंचवीस विकाराचे स्थूळ देह दिसते ॥ दृश्य जड आहे हे चि तू कैसा होशी ॥ जे तू माझे देह म्हणतोस ॥ ते तु कोणे प्रकारे होतोस याळागी तू देह नव्हेस ॥ जाणते चैतन्य मात्र आहेसि ॥ तरी स्वामी मी बहिरा मी मुका मी पांगुळा मी नपुसक ऐसा इत्यादि व्यापार करितो ॥ मि इंद्रिये होय जी ॥ तरी वाया च तुज विवरण कळेना ते ही सागतो ॥ ऐक ॥ प्राणपंचक ॥ अंतःकरणपंचक ॥ ज्ञानेंद्रियपंचक ॥ कर्मेंद्रियपंचक ॥ आणी विषयपचक ॥ कामकर्म ॥ तम ऐसे हे अष्टपुरीचे मिळोनि लिंगदेह याचा विस्तार सागतो ऐका ॥ दाहा इंद्रिय पंच प्राण पंच विषय मिळोनि येक ची अंतःकरण ॥ मन बुद्धि चित्त अहंकार नामे व्यवहार करिते निर्विकल्प स्फुरते ते अतःकरण संकल्पविकल्पात्मक ॥ मन निश्चयात्मिका बुद्धि आठव विसरात्मक चित्त ॥ मीपणात्मक अहंकार ॥ जे इंद्रियद्वारा व्यापार करिते ते अंतःकरण ॥ व्यान प्राणाचे आधारे श्रोत्र इंद्रियी रिघोनि शब्द विषय घेउनि वाचेने बोलतो ॥

मन समान प्राणाचे आधारे त्वचा इंद्रियी रिघोनि स्पर्श विषय घेउनि हाते घेते देते ॥ बुधि उदान प्राणाच्या आधारे चक्षुरींद्रियी रिघुनि रूपविषय घेऊ पाहूनि पायी जाते येते ॥ .चित्त प्राणाचे आधारे जिव्हेंद्रियी रिघोनि रसविषय घेउनि गुह्यद्वारा मूत्रोत्सर्ग करिते ॥ अहंकार अपानप्राणाचे आधारे घ्राणेंद्रिय रिघूनि गंधविषय घेऊनि गुदद्वारा मलोत्सर्ग करिते ॥ ऐसे इंद्रियद्वारा अंतःकरण चतुष्टय व्यवहार करित असता तयासी जाणता वेगळा आहेसि ॥ हे अवघी जैसी स्थूल भूते आणी स्थूल भूताचे अंश जैसी जड आणी दृश्य तैसी हे ही जाण ॥ इंद्रिय आपणासी नेणती दुस्न्यास ही नेणती ॥ तैसे ची प्राण तैसे चि विषय अंतःकरणपंचक ही तैसे चि यालागी हे जड ॥ आणि तुज दिसताहेत ॥ प्रत्यक्ष ह्मणशी माझे कान माझे डोळे माझे तोंड माझे नाक माझे हात माझे पाय ॥ माझे प्राण माझे मन बुद्धि चित्त अभिमान ऐसे जे जे माझे म्हणशी ॥ ते तु कैसा होसी ॥ यालागी तु या लिंग देहाहुनि वेगळा होव की नव्हेस ॥ तरि स्वामी मी हे नेणे मला कळेना तरी हे नेणे ॥ ऐसे कास्याने ह्मणतोसि ॥ येक तु जाणता आहेसि ॥ ह्मणवोनि मी नेणे ह्मणतोसि ॥ जो स्वये वेडा तो काय मी वेडा ह्मणेल ॥ तरि न ह्मणेन मी वेडा ऐसे तुज कळते की नाही कळते तेव्हा तु जाणता नव्हेसि तरि होय जी मी नेणे ॥ ऐसे नेणवेशी जाणतो ते नेणीव ह्मणजे आज्ञान ॥ ते चि तुझे कारणदेह ॥ जन्ममरणदायक ॥ हे चि या अज्ञानाचा निरास झाले ह्मणजे तो चि मोक्ष यालागि तुज ते अज्ञान दिसते की ॥ तरि दिसते यालागी नेणीव ह्मणजे अज्ञान ते तुझे कारणदेह ॥ तू याहुनी वेगळा जाणता चैतन्यमात्र आहेसि ॥ तरी स्वामी मी केवळ ज्ञप्तिमात्र आत्मा आहे ॥ आत्मा आहे ऐसे ह्मणवे ते ज्ञान ॥ ते ज्ञानवृती हि मजमध्ये दिसत नाही तरी भला बापा ॥ जे या देहत्रयासी जाणते ते ज्ञान ॥ तुझे महाकारण दहे ॥ जैसी ते तीन्ही जड आणी दृश्य तैसे चि हे ही जडदृश्य गडिया जाणपणावेगळा ॥ शुद्ध शांत चैतन्यमात्र आहेसि जैसे हे चारी देह दृश्य तैसे चि या चहु देहाच्या च्यार आवस्था ॥ च्यार आभिमानी ॥ च्यार भोग ॥ चाऱ्ही वाचा ॥ चाऱ्ही स्थान ॥ चाऱ्ही मात्रा ॥ चाऱ्ही गुण ॥ ऐसे आहे ॥ तेही तैसे जडदृश्य ॥ परंतु त्याचे विशद विवरण करूव सागतो अैक ॥ जागृती ॥ १ ॥ स्वप्न २ सुषुप्ति ३ तुर्या ४ आवस्था ॥ आभिमानी ॥ ४ ॥ विश्व १ तैजस २ प्राज्ञ ३ प्रत्यगात्मा ४ भोग ४ स्थूल १ प्रविविक्त २ अनंद ३ परमानंद ४ स्थान ४ नेत्र १ कंठ २ हृदय ३ मूर्धा ४ वाचा ४ वैखरी १ मध्यमा २ पश्यंती ३ परा ४ गुण ४ रज १ सत्व २ तम ३ शुद्धसत्व ४ मात्र ४ अकार १ उकार २ मकार ३ अर्ध मात्रा ॥ ४ ॥

| | | | | |
|---|---|---|---|---|
| देह ४ | स्थूल १ | सूक्ष्म २ | कारण ३ | महाकारण ४ |
| अवस्था ४ | जागृति १ | स्वप्न २ | सुषुप्ति ३ | तुर्या ४ |
| अभिमानी ४ | विश्व १ | तैजस २ | प्राज्ञ ३ | प्रत्यगात्मा ४ |
| स्थान ४ | नेत्र १ | कंठ २ | हृदय ३ | मूर्ध्नी ४ |
| भोग ४ | स्थूल १ | प्रविविक्त २ | आनंद ३ | परमानंद ४ |
| गुण ४ | रज १ | सत्व २ | तम ३ | शुद्ध सत्व ४ |
| वाचा ४ | वैखरी १ | मध्यमा २ | पश्यंति ३ | परा ४ |
| मात्रा ४ | अकार १ | उकार २ | मकार ३ | अर्धमात्रा ४ |

याचे विवरण सविस्तर सांगतो ऐक ॥ ऐसे मिळोनि देहचतुष्टय हे त्वंपद शबल वाच्यांश ॥ हे क्षर आणी तत्पद शुद्ध लक्ष्यांश ॥ हे अक्षर ऐसा या देह चतुष्टयाचा निरास त्वंपद शबल वाच्यांश गेला ॥ जीवन हारपले ॥ केवल चैतन्यमात्र तु आत्मा आहेसि ॥ आता तत्पदाचे शोधन ॥ सृष्टिचा क्रम सांगतो ऐक ॥ या सृष्टिहुनि पूर्वी केवल शुद्ध चैतन्यमात्र स्वानंदघन परमात्मा असता ॥ अहं ब्रम्हास्मी ह्मणूनि स्फूर्त्ति जाली ॥ त्या स्फूर्तिचे नाम मूळ प्रकृति ॥ महामाया ॥ या स्फूर्तिरूप दर्पणि जे चैतन्य बिंबले या प्रतिबिंबाचे नाम ईश्वर ॥ या ईश्वरासि जग व्हावे ऐसी इच्छा जाली ॥ या इच्छेचे नाम महत्तत्व गुण साम्य माया त्या मायेशी जगद्रूपे मी च होयीन ह्मणोनि संकल्प उठला ॥ त्या संकल्पाचे नाम त्रिविध अहंकार ॥ ऐसे जे जे होत चालले त्या त्यासि तो प्रतिबिंब उपाधी ईश्वर व्यापिता जाला ॥ जैसे घटापूर्वी आकाश होते ते जे जे घट गाडगे निपजू लागले ॥ त्या त्यासि आकाश व्यापक जाले तैसा हा ईश्वर ॥ जे जे तत्व निपजू लागले त्या त्याशी व्यापू लागला ॥ ऐसा त्रिविध अहंकार जाला त्यापासून त्रिगुणात्मक ब्रह्मा विष्णु महेश्वर जाले ॥ आणी दिशा वायु सूर्य वरुण अश्विनीकुमार अग्नि इंद्र चंद्र उपेंद्र नैऋत्य ऐसे देवतामय मिळोनि ईश्वराचे लिंगदेह ॥ या नाव हिरंण्यगर्भ ॥ तरि ते कसे ऐक ॥ जैसे पिंडी दाहा इंद्रिये पंच प्राण अंतःकरणपंचक तैसे चि येथ ऐक ॥ अंतःकरण विष्णु ॥ चंद्रमा मन ॥ बुद्धि कमळासन ॥ चित्त नारायण ॥

अहंकार रुद्र ॥ ऐसे अंतःकरणपंचक ॥ आता इंद्रियविकार ॥ त्वचा वायु ॥ चक्षु सूर्य ॥ जिव्हा वरुण ॥ घ्राण अश्विनीकुमार ॥ मुख अग्नि हात इंद्र ॥ पाद उपेंद्र ॥ गुह्य प्रजापति ॥ गुद नैऋत्य ॥ ऐसे दाहा इंद्रिय ॥ इछारुप वर्तणे ते चि प्रसिद्ध पंचप्राण ॥ ऐसे मिळोनि हे लिंगदेह ॥ इश्वराचे जाले ॥ परंतु स्थूल देहावेगळा भोग न घडे ॥ ह्मणउन विराट निर्माण केले ॥ ते कैसे ऐक ॥ ये ये कर्तुमकर्तें ब्रह्माविष्णुमहेश ॥ ब्रम्ह्याचा रजोगुण ॥ विष्णुचा सत्वगुण ॥ रुद्राचा तमोगुण ॥ रजोगुणाची क्रियाशक्ति सत्वगुणाची ज्ञानशक्ति ॥ तमोगुणाची द्रव्यशक्ति । या द्रव्यशक्तीपासुन पंच महाभूते जाली ॥ क्रियाशक्ति ज्ञानशक्ति द्रव्यशक्ति ऐसे जाले ॥ ज्ञानेंद्रिय कर्मेंद्रिय ५ प्राण ५ अंतःकरण ५ महाभूते ५ या पंचभूताचे अंश ते पिंडी इंद्रिये ॥ अंतःकरण पंचक दैवतें ॥ पंच प्राण ॥ पिंडीचे अंश ते कार्य ॥ ब्रम्हाड ते कारण

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्रोत्र १ | वाच १ | व्यान १ | अंतःकरण १ | आकाश १ |
| त्वचा २ | पाणि २ | समान २ | मन २ | वायु २ |
| चक्षु ३ | पाद ३ | उदान ३ | बुद्धि ३ | तेज ३ |
| जिव्हा ४ | गुह्य ४ | प्राण ४ | चित ४ | आप ४ |
| घ्राण ५ | गुद ५ | आपान ५ | अहंकार ५ | पृथ्वी ५ |

हे मिळोनि हिरण्यगर्भ जाण विराट् ह्मणिजे ॥ सप्त पाताळ सप्त स्वर्ग ऐसे चौदा भूवनीचे मिळोनि विराट्देह ॥ ते ऐक ॥ नाभीपासून ऊर्ध्वभाग ते सप्तस्वर्ग ते अैक॥भूलोक नाभिस्थान सत्यलोक ब्रह्मरंध्रस्थान अैसी सप्त भुवने ऊर्ध्वभाग ॥ आता सप्तपाताळ भुवने अधो भाग ते अैक ॥ अतल कटि स्थान ॥ वितल जानु स्थान ॥ सुतल गुडगे स्थान ॥ रसातल पोटऱ्या स्थान ॥ तलातल घोट स्थान ॥ महातल पाउले ॥ पाताळ तळवे स्थान ॥ ऐसे सप्तभुवन अधोभाग ॥ या मध्ये सप्तसमुद्र पोट पर्वतादिक पाषाण ते अस्थी ॥ पृथ्वी मांस ॥ वृक्षलता रोमावळी नद्या त्या नाडी ॥ पर्जन्यवृष्टि रेत नक्षत्र त्या माळा ॥ यमलोक त्या दाढा ॥ जीवराशी ते क्रिमि किटक ॥ असे मिळोनि विराट् देह ॥ एवं चारी देह ईश्वराचे जाले ॥ आता त्याची आवस्था चार ४ गुण ४ आभिमानि ४ ॥ स्थाने ४ मात्रा ४ त्या सागतो अैक ॥ ऐसे चारि देहात्मक मिळोनि देह तत्पद शबल वाच्यांश ॥ याचे अहंपणे मि कर्ता मि भर्ता मी हर्ता अैसे ह्मणने ॥

| | | | | |
|---|---|---|---|---|
| देह ४ | विराट १ | हिरंण्यगर्भ २ | माया ३ | माहामाया ४ |
| अवस्था ४ | उत्पत्ति १ | स्थिति २ | प्रळय ३ | सर्वसाक्षिणी ४ |
| गुण ४ | ब्रह्मा १ | विष्णु २ | रुद्र ३ | सर्वेश्वर ४ |
| स्थान ४ | सूर्य १ | चंद्र २ | प्रकाश ३ | कैवल्य ४ |
| वाचा ४ | वैखरि १ | मध्यमा २ | पश्यंति ३ | परा ४ |
| वेद ४ | ऋग्वेद १ | यजूरवेद २ | सामवेद ३ | आर्थवण ४ |
| मात्रा ४ | अकार १ | उकार २ | मकार ३ | आर्द्ध मात्रा ४ |

त्या नाव शिव या विराटी चहु देह निरसन केलिया उरले ते तत्पद शुद्ध लक्षांश ते कळले तेन्हा शिवपण हारपले ॥ आता असिपद ते जहदजहल्लक्षणे जाणीजे ॥ जहल्लक्षणा म्हणिजे त्याग ॥ अजहल्लक्षण म्हणजे अत्याग ॥ पिंडाद्रिक शबळ वाच्यांश टाकणे या नाव जहत् ब्रह्मांडिचा ईश्वर कर्त्ता जो तो की असे म्हणने या नाव अजहत् ॥ आता त्वंपद शबळ वाच्यांश ॥ आणि तत्पद शबळ वाच्यांश ॥ असे उभय या शबळ वाच्यांश टाकणे ॥ या नाव जहत् ॥ आता त्वंपद शुद्ध लक्ष्यांश आणि तत्पद शुद्ध लक्ष्यांश हे उभय लक्ष्यांश न टाकणे या नाव अजहत् ऐसे जहदजहल्लक्षणे येथील पिंडात्मक जीवपण निरसले ॥ तेथील ब्रह्मांडात्मक शिवपण निरसले ॥ जीवशिवपणविरहित येकात्मता या नाव असिपद ॥ ते असिपद शुद्ध चैतन्य मात्र ॥ तु ते आंगे आहेसी होय की नव्हे ॥ तरि स्वामी मी ते चि म्हणने साहेना ॥ म्हणूनि पूर्ण अनुभवाच्या प्रेमे स्वामीसी प्रणिपातु केला स्वामिनि त्यासि आह्लादोनि क्षेमालिंग दिल्हे मग म्हणू लागले की बापा आता प्रत्यक्ष आपुला प्रळय आपण पाहावा की तरि होय स्वामी दाखवावा ॥ तरि दाखवितो पाहे ॥ आधी पिंडिचा प्रळय देहांत समयी इंद्रिय ॥ श्रोत्र वाचा शब्द विषयासहित अंतःकरणी मीळते ॥ अंतःकरण व्यान प्राणाच्या ठाईं मिळते ॥ त्वचा हात स्पर्श विषयसहित मनाचे ठाईं मीळते ॥ मन समान प्राणाच्या ठाइ मिळते चक्षु पायरूप विषयासहित बुद्धिच्या ठाइ मिळते ॥ बुद्धि उदान प्राणाच्या ठाइ मिळते ॥ जिव्हा गुद्य विषयासहित चिताचे ठाइ मिळते ॥ चित प्राणचे ठाइ मिळते ॥

घ्राण गुद गंध विषयासहित अंहंकारी मिळते अहंकार आपानाचे ठाइ मिळते ॥ अपान प्राणाचे ठाइ मिळते ॥ प्राण उदानाचे ठाइ उदान समानाच ठाइ समान व्यानाच ठाई व्यान क्रियाशक्तीचे ठाइ क्रियाशक्ती रजोगुणी मिळते ॥ रजोगुण ब्रह्माच्या ठाइ मीळते ॥ मग देह निश्चेतन पडते ॥ हा पिंडीचा प्रळयासी मूल अज्ञान गेलें असलें तरी पूर्ण चैतन्य मिळेल ॥ जरी अज्ञान गेले नसले तरी आणीक जन्म मरणीशी अधिकारी होवोन चौऱ्यांशी लक्ष योनींच्या ठाइ सुखदुखे भोगावे लागतात ॥ येणेपरी पिंडीप्रळय ॥ ७ ॥ अता सृष्टीचा प्रळय अैक हे प्रसिद्ध पंच महाभूते ॥ पृथ्वी १ आप २ तेज ३ वायु ४ आकाश ५ त्यामध्ये पृथ्वी दशसहस्र लक्ष योजने विस्तीर्ण त्याचे शतगुणिने समूद्र ॥ याचे दशगुणीने वडवानल ॥ याचे दशगुणीने वायु ॥ वायूचे दशगुणीने आकाश ॥ याचे दशगुणीने अहंकार ॥ त्याचे दशगुणीने महत्तत्व ॥ त्याचे दशगुणीने मूलप्रकृती ॥ मूलप्रकृतीहुनी ॥ आपरिमित चैतन्य मात्र ज्ञानघन ते तु होयस की तरि होय जी ॥ अैसे असता पृथ्वीचे ठाई ॥ कितेक वर्षे आनावृष्टी जाली ॥ बारा सूर्य तपू लागले तेणे करिता जितुक्या वनस्पति तितुक्या जळून गेल्या ॥ तो कितेक वर्षे पर्जन्य मुसळाधारी वषू लागला ॥ तेणें पृथ्वी समग्र विरूनि समुद्रात गेली ॥ कितेक वर्षे जलमयेच होते ॥ त्या जळाशी वडवानळ शोषित आला तेणे जळ शोषुन कितेक वर्षे आग्नीच होता त्या अग्नीसी वायु शोषुन कितेक वर्षे वायुच होता ॥ वायुस आकाश गिळिले ॥ त्या आकाशीं द्रव्यशक्तिने गिळिले ॥ द्रव्यशक्ति तामसगुणी मीळाली तामस गुण आणी रुद्र अहंकारी मिळाले ॥ आता देवतामय जे अंतःकरणपंचक ते विष्णुच्या ठाइ मिळाले विष्णु सत्त्वगुणी सत्त्वगुण अहंकारी मिळाल ॥ अैसे त्रिविध अहंकृतिमध्ये ब्रह्मा विष्णु रुद्र मिळाले ते त्रिविध अहंकृति महतत्वी महतत्वी मिळाले ते महत्तत्व मूलप्रकृतिमध्ये मिळाले ॥ ते मूळमाया शुद्ध चैतन्यी मिळाली यावरी मग चि तु होवोनि निर्विकल्प स्फुरणातीत स्फुरणे राहातोसि होय की ॥ तरि होय स्वामी ॥ स्वामीचे कृपेने माझे म्या आत्मस्वरूप वळखुन उत्पती स्थिति प्रळय प्रत्यक्ष म्या पाहिले ॥ आता स्वामीच्या उपकारासि काय उत्तिर्ण होउऊ म्हणूनि प्रेमाचे निर्भरे सद्गदित होउनि साष्टांग प्रणिपात केला स्वामीनी त्यासी हृदयी धरुनि आलगिले ॥ म्हणू लागले कि बापा हे स्थिति जिरवावया काही येक सांगतो अैक संमती शंकराचा याची वेदवचन येणेरीतीने जाणोनि राहणे ॥ श्लोक ॥ ब्रह्मज्ञानमयो हि केवलनिराभासोहमात्मा स्वयं ॥ आनंदोहमनंत एव सकलो ज्ञानामृतोहंशिवः ब्रह्मानंदसुधाब्धिरद्वयमहं विश्वं भवेद्वीचिवत्

पूर्णानंदमहं विभाति सततं ब्रह्मास्वहं नान्यथा ॥ १ ॥ वेदवाक्यप्रज्ञानमानंदं ब्रह्म इति ऋग्वेदो वदति ॥ अहं ब्रह्मास्मि इति यजुर्वेदो वदति ॥ तत्त्वमसीति साम वेदो वदति ॥ सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म अथर्वणवेदो वदति ॥ शास्त्रदृष्टिर्गुरोर्वाक्यं तृतीयं चात्मनिश्चितं ॥ त्रिविधं यो विजानाति स मुक्तो जन्मबंधनात् ॥ १ ॥ असे प्रकारे वेदोक्त जाणूनि आत्मरूप अनुभवणे ॥ जरा मरण देहधर्म ॥ क्षुधा तृषा प्राणधर्म ॥ सुख दुःख मनोधर्म ऐसे जाणून हे धर्म साहावे ॥ आपुल्या माथा न घेऊनि अपार अबाधित प्रारब्ध दग्ध पट न्याय देह ॥ ऐसे देहासि प्रारब्धासि गाठी घालोनि सद्गुरुभजनि कालक्षेप करी होत्साता कृतकृत्यत्वं प्राप्त इति सिद्धं ॥ इति श्रीमत्परमहंस काव्यार्थं श्रीमत्पुर्णानंद नाथ लक्ष्मीनारायणानूचर शिवरामव्यरितायां पंचिकरणं संपुर्णं ॥ श्रीगुरुआनंदरामानंद नाथार्पणमस्तु ॥

# वामनकृत ब्रह्मनिरूपण

ब्रह्म जाणायाची इच्छा आहे तरी तुचि पाहे आपणाते ॥ १ ॥ अपणाशी बरे वोळखसी जेव्हा ॥ सर्वग तेव्हा तुचि होसी ॥ २ ॥ ज्या ब्रह्म व्हावे ऐसी इच्छा कवणासी ॥ ते चि अविनाशी ब्रह्म जाण ॥ ३ ॥ जाण निजरूप या देहावेगळे ॥ जरि हा केवळ आत्म्याविण ॥ ४ ॥ जाण निज आत्मा ब्रह्म ते आपण ॥ पाहे हे चि खूण तुझीच तु ॥ ५ ॥ तुचि सांग तुझे निजरूप कोण ॥ आपल्या आपण विचारूनि ॥ ६ ॥ विचारूनि देह मी जरि म्हणशी ॥ स्वप्नी हि देखशी देह जैसा ॥ ७ ॥ जैसा स्वप्नदेह तु नव्होसि सहसा ॥ जाण निजरूप या देहा वेगळे ॥ जड हा केवळ आत्म्याविण ॥ ९ ॥ आत्म्याविण देह शव दीसताहे ॥ प्राण तोची नव्हे निजआत्मा ॥ १० ॥ नसे ज्ञान प्राणाविण चिंतन ॥ तेही तुझे मन नव्हे आत्मा ॥ ११ ॥ आत्मा प्राण तरी विषयाचे ध्यान ॥ मी तू ऐसे ज्ञान प्राणा नसे ॥ १२ ॥ आत्मा नव्हे मन विषयाचे ध्यान ॥ उरे तेही मन सुषुप्तासी ॥ १३ ॥ सुषुप्तीत काही नाहीच प्रचीती ॥ त्याही शुन्याप्रति जाणसी तू ॥ १४ ॥ जाणसी तू ते काहीच न कळने ॥ जागृती ते जाण तो चि आत्मा ॥ १५ ॥ आत्मा तु वोळख मनोमय कोशी ॥ आता उपदेश देयी चित्त ॥ १६ ॥ चित्त बुद्धि मन चौथा अहंकार ॥ मायाची निर्धार स्वरूपाची ॥ १७ ॥ स्वरूपाचा थारा चहुमाजी जेथे ॥ वाटे तुज तेथे निज पाहे ॥ १८ ॥ पाहा ते पाहाणे आपणची आहे ॥ ते चि ब्रह्म पाहे सर्वदेहि ॥ १९ ॥ देहि जे जे आहे ते ते हे चि पाह ॥ पाहाता तो आहे वेगळाची ॥ २० ॥ वेगळेची आधी हे तत्त्व जाणावे ॥ मग ते पाहावे सर्वा ठाई ॥ २१ ॥ सर्वा ठायी सर्व

देह इंद्रियाते ॥ तेचि वर्तवीते असे पाहे ॥ २२ ॥ पाहे हे ची सत्य सर्वत्र जाण ॥ असत्य हे सर्व मृगजळ ॥ २३ ॥ मृगजळ हो पाहाता जैसे सूर्यकीरण ॥ विश्व तैसे जाण सर्व ब्रह्म ॥ २४ ॥ सर्व ब्रह्म पाहे वामनस्वरूपी ॥ त्रिविक्रमरूपी विश्वरूप ॥ २५ ॥ इति श्रीवामनकृत ब्रह्मज्ञाननिरूपणं नाम समाप्तः ॥ विश्वेश्वरारपणमस्तु ॥ शुभंभवतु । श्रीगंगादेव्यारपण मस्तु ॥ समंत १८८७ शके १७५३ प्लवनाम संवत्सरे वैशाखे मासे शुक्लपक्षे द्वादसि त्रितिय प्रहरे समाप्तः ॥ लिखितं स्वार्थं परार्थं वसुदेव ह्यारि थिटे लेखक पाठकयोः शुभंभवतु ॥ याद्रिषं पुस्तकं दृष्टा तादृशं लिखितं मया यादि शुद्धमशुद्धं वा मम दोषो न विद्यते ॥ श्रीसार्वारपणमस्तु ॥ ॥ श्री ॥

# वैद्यक

अथ क्षतास उपाय ॥ धुपारा ॥ हिंगुळ मुरदाशिंग दोन्ही सोपा निळेचे कोळसे जित येकत्र करून वाटणे धुर घेने दिवस ७ पथ्य सोजी अळवणि खाने रोग जाय ॥ पारा आसवंदा करुण मारणे जायफळ जायपत्रि लवंग सुंठ मिरे खुरासनि घोवा येकत्र करून गोळि भक्षिणे पथ्य भात रोटि तूप खाने रोग जाय ॥ गंधक तेल उतरने ॥ गंधक चूर्ण करून वडाच्या चिकात मर्दुन गोळि करणे सूर्य यंत्री लावने तेल उतरेल ते विड्यासि खाने तेय होय ॥ तुरटीमध्ये हरताळ खलने खालि रान ठेवणे त्रिपुर करमे सायंकाळीं अग्नि चार प्रहर देने सिद्ध होय ॥

अथ मुळव्याधिस औषध ॥ पांढरे तीळ आंबिहळद बिबे समभाग कढवने नवसागर टाकने वाटून भक्षणे रोज २१ पथ्य जोंधळे याचि भाकर दधि भात अळवणी भक्षने अवषध सम भाग मात्रा दररोज ৳৳৳३ घेत जाणे ॥ लसून सेर ৳৳१ मुरदाशिंग ৳৳৳।॰ येकत्र वाटिजे गजकर्ण वर्ण घासिजे वर शाहि लावजे त्यावर थाप दिजे घटिका चार गजकर्ण जाय ॥ सोमल दाहाबिबे आतसेर ऋयिचा चिक तेल येकत्र कढवने उत आलियासि उतरणे अंगास लावणे उष्ण घेने रोज तिन गजकर्ण जाय ॥ अथ निदानं ॥ रात्रौ दग्धभूमी तपननिदिवा जायते सीतलत्वं ॥ कंठे श्लेष्मा विसर वदना कुंकुमाकार नेत्रं ॥ जिव्हा कृष्ण स्थळ त्वंच सूष्मा च नाडिभद्वैषज्यं स्मरणमरणासम रामेति रामा ॥

श्रीगणेशायनमः ॥ अथ खरूज प्रकारः ॥ तूप ৳৳१ मनसीळ ৳৳৳।॰ मोरचूत आदतोळा ৳৳৳१ ॥ आठबिबे कढवने सीतळा पानीयात टाकने भिजलियावर निरपून घेने आंगास लावने खरूज गजकर्ण जाय ॥

कवळास औषध ॥ बोरिचा पाळा ८८॥॰ ताकासी वाटून देने पथ्य दहिभात देने रोज ३ कवळ जाय ॥

अथ ताम्रभस्म ॥ तांब ८८।॰ पावसेर याचि पत्रे करूण गंधक ८८।॰ पारा ८८८१ येकत्र खलून तगटास लावने पराचरी देने वर खालि खापर देने त्याजवर कपटलेख करूण अग्न देने भस्म होय ॥ अथ रुप रस क्रिया कथील ठन करणे आंत पारा टाकणे तोळियात तोळा पाव सिद्ध होय ॥

अथ वंगेश्वररस ॥ कथील पारा युक्त करणे हळदिवो विवा करूण मारणे चुलीवर खापर ठेवने आहाटने राख फुकून टाकने भस्म होय ॥ याचि अनुपान सुंठ मिरे पिंपळी पिंपळामुळ तजपत्र नागेश्वर लवंग पात्रि जायफळ खुरासनी वोवा अजमोदा आकळकाढा येकत्र करूण मेळवने सहद्रामध्यें गोळी करणे ते भक्षिणे पथ्य आंबट तिखट तेल वर्ज ॥ छ ॥

कडिस उपाय ॥ हिंगुळ तोळा ८८८१ आकलकाठा तोळा येक ८८८१ कासराचि वाटि घालुन भस्म करणे ही येकत्र करूण तेलासि खलने कडिस लावने आत घालने वरि वेट घुडियाचि बळकट देउन बांधने आंबट तिखट तेल वर्ज रोग समे ॥

मोठे मानसास अगर लेकरास बीजनळ अगर संताचि उत्पत्ति असोन पोट सोडत असले त्यास अवषध ॥ काळा बोळ हिंग डिकिमालि सदहुं गोळी मायिचे रसात करूण देन कुड पाहून वित्र × व गुळात गोळी करूण देन ॥ रगतबोळ आंबिहळद सदहुं माठेफळासि देन जवखार मासा भर लोनियात गोळी करून देउन वरती पथ्य दूध भात ॥

अथ पारज प्रयोग ॥ पारा आवळीचा रस ८८॥॰ तुळसीचा रस काळिया धोतऱ्याचा रस ८८॥॰ शुभ्र चिघी सजिर व × × × टागानेर कळी.

रस वतोल त्या रसा करूण मेळिया सिद्ध होय ॥ × × × चाळप्रमाणें विडियाशी खाने प्राणी तेजवंत होय.

अथ रस उतार ॥ पारया सिरडे ॥ बाभुळिची साल निवुखार सोवार बोगि सांटुळमायाचा काढा करूण गुरळिया दाउन पोटांत देने नाडिस सांदे सांदे जिरवने उतार होय ॥ हरताळाचा उतार काटेकोहळियाचा रस जिरवणे उतार होय ॥ हिंगुळाचा उतार रान पोफळि रानमुळा × × × उतार दुध ॥ सोमलाचा उतारू सोनहुंवा ॥ आफूचा उतार मुळतान्या हिंग सम भाग देने ॥

अथ बीज स्तंभ प्रयोगः ॥ खारजूर सवा सेर ॥ साखर रायपुरि सेर मकंटीचे बीज सेर कुपका पावसेर १८८ कीरव्याचे बीज पावसेर ८८।॰ भाटिपाचे बीज पावसेर सुंठ पिंपळी मिरे पिंपळामुळ वजन तोळे ८८८१

कलमि तुज ८८८६ लवंग जायपत्रि दर तोळा ८८८६ येक वाघाटिचे मुळ भेंडिचे मुळ घाटुळिची मुळि सराटे पांढऱ्या गुळवासाचा कंद दुध तीन सेर ८८३ त्यांत पाक करणे वारवार भुरका टाकने पाक सिद्ध होय ॥ सुपारि प्रमाण मात्रा करण सायं प्रातःकाळी भक्षने पथ्य आंबट तिखट वर्ज सातवे दिवसी जागने वीर्यस्तंभ होय ॥ गत इंद्रियतेजाः तेजःपुंज विरामा न होय ॥ पक्क भोकरिचे घेरटे सवासेर साखर सवासेर पत्री लवंग जायफळ टर तोळा ८८८३ तजपत्र नागेश्वर तोळा येक ॥ वाघाटिच्या मुळाचा भुरका ८८८३ दुधांत पाक करने गोळि बांधने सायंप्रातः काळी भक्षिणे गेल इंद्रिय सिद्ध होईल ॥ पथ्य आंबट तिखट तेलकट वर्ज ॥

आतां बाळाची चिकित्सा सांगेन ॥ वातरोग स्त्रियेसी उपजे तिचे दुध बाळ पीत बाळास रोग उपजे स्वर नासे भुकेल अैस होय ॥ थोड थोड मुत्र पडे पोट फुगे मळ भिन्न पडे तिन्हि थन वर्के उपडे ॥ पीतरोग स्त्रीस बाधा असे तिचे थान लेकरू पी तरी त्यास दोहो तृषा उपजे ॥ स्त्रियेसि श्लेष्मा होय तिचे थान लेकरू पि तरी त्यास जांभाळया ये आंग मोडे दे डोळे उघडिना रडत असे त्यास प्रति · पाक गुळवेल निंब धातावरि धायफूल समभाग काढा किजे अष्टांश दिजे दिवस तिन सावद होय स्त्रियेसि असमाधान असे थानि दुध नासे अथवा थान गुंतल असे याचा रोग बाळास होय तर ॥ इंद्रावनी च मूळ नासु दिने वे वहिरे ॥

आतां ग्रहाचा बाधा सांगेन ॥ बाळ उडे दचके नख दांत वरी भोये उंचटि आपण आपणास वर्पि वर्ते पाहे दांत खाय ॥ जांभाळया दे आसोडा दे अवया गाठी पाटि दाता अबाट खाय केसा सारिखा द्दागे राति निद्रा नये ॥ श्वर कर्ष होय ॥ मास या सारखि सड घान उपजे कारत्का अैसी घान उपजे हे बाळक ग्रह वेष्टित जाणाव ॥ आतां गृहाचा बाधा सांगेन ॥ एक डोळा येक दात येक पाय कापे आंग फूगे घाम जे वाते वास पाहे ताम्र डोळे तोंड तांबड होय रक्ताचि गंधि आंगि उपजे दात खाय विकळ जाय कीर किर रडे पाखराची गंधी उपजे दात खाय फोड उपजेत तो रक्त गृह जाणावा ॥ अतीसार ज्वर तृषा वाकडिया दृष्टि पाहे रडे निद्रा न करि थान न घे सरदि कास असे त्यास भुतनेचि बाधा जाणावि ॥ आंगिचा वर्त अंत्रा सारिखा होय तोंड कोमाईजे आंग पाणये दंत खाय तरि मुख भडकेचि बाधा जाणावि ॥ १ ॥ याचि परि उन्माद गृह सांगितले त्याचि चिन्हे जाणावि अनि औषध योजावे ॥ कोष्ट हरीतकी येखंड ब्रह्मभेद्दंकि अैसि भाग चूर्ण किजे तुप अवलीह किजे दिवस तीन उटणे बाळास किजे नीट होय ॥ सेळिचे दुध आनुन आत काळे मातीचा गोळा ताउन त्यात विझाविजे मग

लेकरास नाभिलेप किजे शेकिजे शोक शमे ॥ लेकराचा नाभि पाक होय तरी दोन्हि हळदि लोध्र त्रियंगु जेष्टमद औसि तेलात समभाग पचविजे ते तेल गालुन घेइजे मग लेकराचे आंगास हाता पायाचा संधि रगडिजे नाभिपात आवचुनि त्रिदोष फिटे ॥ १ ॥ आडोळसा इंद्रजव समभाग कढिजे आष्टो लेकरास दिजे ॥ अतिसार शमे ॥ १ ॥ यानिचे दुधास्तव जे रोग उपजति समति अतिसार ज्वर नासे मदापिंपळि काकडसिंगी वरुणा याचे समभागे चूर्ण किजे मदेसि दिजे तरी अतिसार शमे ॥ कासश्वास सरदि नासे ॥ धायफूल बेल कोथंबीर लोद इंद्रजव दोन्हि वाळे समभागे चूर्ण किजे मदेसि अवलेह किजे ज्वर अतिसार अंतर दोष नासति ॥ मंजिमंजिष्ट धायफूल लोदकावाळिचा गुळयाचा समभाग अष्टोष काढा किजे मदेसि दिजे बाळकाचा ज्वर अतिसार शमे ॥ १ ॥ दुलंभा गुळवेल समभागे अष्टोपश काढा किजे वातज्वर नासि ॥ द्राक्षाख्रोद समभागे चूर्ण किजे आडोळसाचा रस वो मधु साकरेसि दिजे तरि नाकि मुकि रक्त वाहे ते समे ॥ धतावरि गुळवेलिचा रसा मध्ये दिजे वातज्वर नासि ॥ कंकोळ डोळारिमुस्ता कोष्ट देवदार काकडसिंगि गुळवेल सुंठि समभाग काढा किजे वातज्वर नासि ॥ बाळक परिक्षा समाप्तः ॥

गत नाना उद्भव शरीरी उपजलिया नानाशास्त्र पाहोन उपचार सांगेन ॥

अथ सीर वेथा ॥ कपाळि दूधाचे तुपानि माखिजे वरि काष्ट मुरका घालून वरि पिंपळिची पान बांधिजे कपाळ राहे ॥ १ ॥ देवदार १ कोष्ट १ हिंग १ वेखंड १४ रुचीक उगाळून स्वल्प तेल घालून तिळेल उन करोण माथा कपाळी लेप किजे वरि पिंपळिचि पान घालुन समान शेक किजे शिर वेथा दूर होय ॥ नायसमुळे आनुन उन करणे कपाळ तुपे चोपडून वरि नाये डोइ कपाळावरि बांधिजे सेक किजे वेथा राहे ॥ निर्गुडि रसे मिरे उगाळून नस दिजे अर्धं सिसि जाय ॥ आसवंद पाला वाटून कपाळी डोइं वरि बांधिजे शिर वेथा शमे ॥ कोष्ट मिरे येरंड मूळ तांदूळ वाटून लेप किजे गुगुळ तुप धोविजे वेथा जाये ॥ श्वेत सुंपाळिमुळे उगाळून नस दिजे वेथा शमे ॥ तगरू रिंगणी धोडपा येरंडमूळ राष्णा सुंठि हरणवेल काष्टमद वावडिंग सेंधव यांचे चौगुण चणीयाचे तेल तितका माकीयाचा रस तितके अजाक्षीर येकत्र कढविजे नाकीनस दिजे मस्तकीचे सर्व रोग जाति ॥ वेथा राहे ॥ सुंठ निर्गुड वेखंड पिंपळ्या येकत्र उगालुन कपाळी लेप किजे वेथा राहे ॥ रिंगणीरस तेल कढवून कपाळि लाविजे वेथा शमे ॥ सावरीचा रस दिजे अर्वडि वेथा शमे ॥ गोडिया निंबाचा निंबोळ्या कांजिये वाटून कपाळि लेप किजे अर्धसिसि जाय ॥ येरंडमूळ कांजिये वाटुन लेप किजे वेथा शमे ॥ जेष्ट मद तुपेसि नस दिजे वेथा शमे ॥

अथ नेत्र उपचार ॥ माकियाचे मूळ तांबियावर उगाळून डोळा घालिजे चिपडे जाति ॥ सोनवळिचा रस नेत्रि घालिजे रक्त फाके ॥ जटामांसि निंबाची पाने वाटुन रस डोळा घालिजे रक्त फाके ॥ आघाडियाचें मूळ, गाइचें तूप, दहि, याचे पाणि सैंधव, गोरोचन, हे तांबियावर उगाळून नेत्रि घालिजे झडल्यापात ज्याये ॥ तीळ, सतांजन, मदे उगाळून डोळा घालिजे त्रिमिर जाय ॥ तिळाचें फुलें ८० पिंपळिचे तांदूळ ६० एकत्र करून नेत्रि घुइंजे वरि जोपकिजे त्रिमिर जाय ॥ हेंच औषध दहियेचे पाणिये घालिजे रातांध जाय ॥ पाणी ये रक्त फाके कांजियें पडळ जाये ॥ कमळ सैंधव रातांजन त्रिफळा वस्त्रगळीत करून नेत्री घालिजे त्रिमिर जाय ॥ बेळाच्या मुळाचा रस, घोडियाचे मुत्र डोळा घालिजे फुल जाय ॥ गुळवेलिचा रस सैंधव मर्दून नेत्रि घालिजे झावळ तिमिर जाय ॥ व्याहाड्याचा व्या जेष्ठमद मद मिरे मोरचूद उगाळून नेत्रि घालिजे त्रिमिर जाय ॥ गाढवाचा खुर उगाळून उन करून नस दिजे शिर वेथा जाय ॥ मिरे १, कुकूं १ तोळ डोइंस लाविजे दारुणा जाय ॥ महानिंबाच्या निंबोळया वाटून लेफ किजे खवडे जाति ॥ नेत्र उपचार ॥ पांढरे कनेराचा रस डोळा सुजे, पाणियाचे डोळे हालु होती ॥ कासळिचे मूळ जांबूळ उदके उगाळून डोळा घालिजे तिडिक रक्त राहे ॥ कारळिचे मूळ, अश्वमूत्रे उगाळून डोळा घालिजे पडळ जाय ॥ देवद्वार बोकड मूत्रे उगाळून डोळा घालिजे चिपडीविलास जाय ॥ सिरस सैंधव हिरडा पळसाचा अंतर साळिचा रस राई दहि मेळवून वस्त्रगळीत किजे सुइंजे पडळफूल नीळ चिपडी जाति ॥ पांढरी घेटुळीचे मूळ पाणिये उगाळून डोळा घालिजे मूळ जाय ॥ भद्रमुस्ता बोकडमुत्र उगाळून डोळा घालिजे बहुता दिवसाचें फूल जाये ॥ आघाडखार जाळून मसकिजे डोळा घालिजे त्रिमिर जाय ॥ सखु वाचा हरीतकी मिरे काष्ट व्याहाड्याच्या व्या घोडिचे मूत्र डोळा घालिजे त्रिमिर पडळ फूल जाय ॥ १ ॥ पिंपळी पिंपळामूळ चित्रक पाडा डआंळिबे याचा रस नेत्रि सुइजे नेत्ररोग जाय ॥ वांझ कर्कोटिचा कंद पाणि उगाळून डोळा घालिजे निद्रा जाय ॥ बेलाचे मूळ मिरे हरणाचे मूत्र डोळा घालिजे त्रिमिर पडळ निळिफूल राती अंध इतुके जाये ॥ हिरडेबीज मिरे चिलष्टि बीज गंगावती बीज समभागे चूर्ण किजे आवळे भावना दिजे ॥ यानिचे दूधें नेत्रीं घालिजे दृष्टि निर्मळ होय ॥ निंबाची पाने मिरे व्याहाडामो समभाग बोकड मुत्रे वाटुन वटि किजे थानिचे दुध उगाळून डोळा घालिजे त्रिमिर पडळ चाखनीळी काचनिळी इतके जाती ॥ गोखरू मूळ धोतऱ्याचे मूळ वाटून नेत्रमाजि घालिजे मागुते न येति ॥ १ ॥ पांढरि काह्हा अथवा कारळिमूळ अथवा घेटाळि मूळ अथवा सावेरि मूळ

पानिये उगाळून डोळा घालिजे निके होति ॥ हिरडे सेनांत घालून गुंडून गडद खांदोन पुट दिजे मग बीज काढिजे गाईंचे लोनिये मर्दोनि लेहुजे निके होति ॥ हळकुंडगाठे सोळा व निंब रिसांत बांकुड मूत्रांत दिन ७ धोतऱ्याचे पानि बांधोन पुट दिजे निंबरसे वाटुन गोळिया किजे नेत्रि घालिजे निर्मळ होति ॥ सेडगे पानाचा रस मधारि लेईजे तिढिक शमे ॥ हिरडेची रक्षार गोमुत्रे लेहुजे निके होति ॥ समुद्र फेन पानिये वाटुन लेहुजे निके होति ॥ हिरडे ११ बीज काढाढिजे पिंपळि व आवाळे रस मर्दिजे सावलीत वाळविजे उगाळुन नेत्रि घालिजे दृष्टि निर्मळ होय ॥ सुंठी निंब उदक वाटुन डोळा सुद्दजे त्रिमिर जाय ॥ कडु आपकोंचि मषि किजे मद्दासि नेत्रि लेहुजे रातिअंध जाय ॥ विबे राति कांजिया मध्यें भिजो घालिजे उदक काढिजे गाईंचे लोनिया मध्यें तिळ दडपून काढिजे टकोर डाकोन देन मग तेल लोनि सांबियान मर्दिजे ते लोनि उदकामध्ये ठेउन डोळा लेहुजे रात्रि समधि उडवियाचे फुल जाय ॥ नागर मोथे वावडिंग टाक १ लवंगा टाक १ मोरचूत १ खापरिया तुरटि १ येळा १ बोळ १ येकत्र करून अजा मुत्रे खलून निंब रसे पुटे सात दिजे ठतरनी रस पुट ७ दिजे व टिका किजे नेत्रि अंजिजे सर्व नेत्र रोग जाति ॥ पाणि ये त्रिमिर जाये पडळ जाये पुत्रवंतिचानि दुधे मर्दुळिया दृष्टि ये ॥ गाईंचे लोनिये किढि असे ॥ त्यासी केष निघाति कारळीचे मूळ घोडियाचे मूत्र डोळा घालिजे रातिअंध जाय ॥ कडु तोंडळिचे मुळ पाणिये वाटून डोळा घालिजे रातिअंध जाय ॥ तेल कढले लुगडे रज येकत्र जाळिजे येरोल तेल घोळिचे लेंडिवर घालिजे ते लेंढि जाळिजे बाजि वागांतावर वाळा घालून वाटिजे नेत्रि सुद्दजे रातिअंध जाय ॥ त्रिफळा गुळ आलेसि सेविजे कवळ जाय ॥ देवडोंगरीचे बीज तांदुळ धुघनिसी वाटून नसु दिजे कवळ जाय ॥ येरंड मुळ मद्दासि दिजे कवळ जाय । पांढरिया घेटळिचे मूळ मद्दासि वाटून दिजे कवळ जाय ॥ नुरता हिंग डोळा घालिजे कवळ जाय ॥ तिळवनिचा रस तिळेल मर्दून डोळा सुद्दजे निळी टीक जाय ॥ गेह फुटे लोह गर्जें बाहिर गोरा हाक दे हुंबर सोडे जवि गर फुटे हुंबर वाया लेकरासः होति तरि लेकुरास तेल वाटीस घालुन लोहुवरि ठेऊन भरिजे उतरिजे ॥ कवळ जाय ॥ हिंगनाचा ढिरीचा लाहान वाटिजे मिरे घालुन वटिका किजे पोफळ प्रमाण घेविजे कवळ जाय ॥ हिरडा मोठा पाहोन गेहूसी मूत्रामध्ये भिजू घालिजे मग नर मुत्र उगाळून नेत्रि लेहुजे नाखि घाडळी असेल ते तुटे ॥ इति नेत्ररोग प्रकर्ण समाप्तः ॥

अथ कर्णरोग चिकित्सा सांगेन ॥ देवदार हिंगसिर अकोष्ट सैंधव सेवगे रस येकत्र येकत्र करूण ते आत्र कढविजे कानि घालिजे कर्णमूळ जाय ॥

सैंधव मेंढिचे दुध कानि घालने कर्णमूळ जाय ॥ नागरिचा पाला लाहळरी वाटून तेल घालुन कानि घालिजे बाहिरत्व जाय ॥ १ ॥ सैंधव हिंग सेपा वेखंड कोष्ट बोकड मुत्र कानि घालिजे तिडिक शमे ॥ १ ॥ रुई वाळयाचा रस कापुराचि पुटली करून कानि घालिजे तिडिक शमे ॥ १ ॥ गायिचे तूप साकर उन करूण कानि घालिजे तिडिक शमे ॥१॥ तिळघनिचा रस कानि घालने तिडिक शमे ॥ १ ॥ समुद्र फळ कूट करून कानि घालिजे रंद राहे ॥ १ ॥ सुंठ सैंधव भद्रमुस्ता पिंपळी लसन कोष्ट विळसा येकत्र उगाळून रुइचा पिकल्या पानाचा रस घालून नविक तिळेल घालून उन करून कानी घालिजे तिडिक शमे ॥ ××× हरे ॥ अळिता निंबरस कालउन कानि घालिजे वेथा राहे ॥ इति कर्णरोग उपचार समाप्तः ॥

अथ नासारोग उपचार सांगेन ॥ विषवे सैंधव पिंपळी शर्करायुक्त घेइंजे स्वय सुगंधि जाय ॥ चवि आम्लवेतस त्रिकुट तालिस जिरे निवहिंग कवारा रोचन बिजानक चित्रक सर्वां सम गुळ वटिका करून जे विजे स्वर भंग पिनस फेडि ॥ १ ॥ विहसा कोष्ट हळदि देवदार दारू हळदी सैंधव जवखार ये म्हीपजे तेल नसुदिजे येव्हे नासती नासिक रीसे ॥ १ ॥ नाकामध्यें फोड अथावा अंकुर खपलिया ते नासिवरिस म्हणति ॥ क्षारिचे नाचके पानि नाकामध्यें उदक घालिजे पिनस जाय ॥ १ ॥ कुतरे मुतलेला इभुद ज्यालि असेल तेथिल छत्र निघालि असे ते घेइजे सुत्रि तेल घालु कढविजे नसुदिजे पिनस जाय ॥ १ ॥ सुंटि सहद तुप साकर येकत्र करुण देमधि वरि तळि अदि घालिजे पुरिजे दिवस २१ असो दिजे ते घेविजे पिनस श्लेष्मा जाय ॥ १ ॥ रुचिक हिंग भिजविजे काळे २ दिजे त्याचे नाकि धूर दिजे रक्त राहे ॥ पिकले उंबर पिकले सिदन आंबोळयाचि फुले आवळकांठि येकत्र करून खांड मदुसि दिजे नाकिंच रक्त राहे ॥ १ ॥ गव्हाचि कान्हि पाटावाचि मसि येकत्र करूण कोजिये वाटुन नस दिजे ॥ तवखीर गोपीचंदन कोष्ट साकर दूध मर्दून नसु दिजे रक्त राहे ॥ १ ॥ कांबे सेंदूर रुचिक देवपळेचिं फुले येकत्र टालु पासून जिरवने लेप किजे गव्हाचि सोजि रांधिजे उनउन त्यावरि लेप दिजे रक्त राहे सोन पडवळि गुळवेल निंबु मुस्ता हिरडा निळोत्पळ सम भाग मद साकरेसि दिजे रक्त राहे ॥ इतिनास रोग प्रकर्ण समाप्तः ॥

अथ मुख रोग उपचार सांगेन ॥ खैर हिवर कोराटा आसवंद याहाचि साली पाणियामध्यें कुट किजे गुराळिया टाकिजे ता( दा )त बळकट होति ॥ आस्वंद मूळ साळि रुइचि मुळिचि साळि हिंग येकत्र करून उनळिने दाढे धरिजे निवारे दात वेथा ॥ १ ॥ नागवेलिचि गुदि करून दाढेसि घालने दाढेचि कळ जाय ॥ जायपत्रि वसो वेखंड पिंपळी कोराटा कोष्ट चवी हिरडा सुंठि

सम भागे चूर्ण करुण पोटोळि करूण विडियात धरिजे दात बळकट होती ॥ कफु जाये दातिची कळ जाये किडि मरे दुर्गंधि नासे ॥ कोरांटा दारू हळदी आंबिहळदि हाजालुचि मुळि पाहाडके दारमाळ कगोनि मूळ सम भागे घाटि करून दाते धरिजे किडि मरे ॥ १ ॥ चुना पिंपळी हाचिकपान वेखंड कोष्ट हळदि तेल वाटून तोंडि लेपु किजे वंगवन मुरूम जाय ॥ १ ॥ पिकलिया निंबुवचा रस लावित जाइजे वन जातो ॥ जायफळ जायिचिसालि पाणिये वाटोन लेप किजे वन जाति ॥ १ ॥

जायपत्रि गुळवेल द्राक्षे देवदार धात्रिफळा काथ मद साकरेसि दिजे मुखरोग जाय ॥ बाळाकाळा पिंपळी बाबरिसेवंतिफूल वाळा हा लेप किजे जिव्हेसि फार मुखरोग जाय ॥ १ ॥ हाळदिचा काढा करून गुरळया टाकिजे मुखरोग जाय ॥ १ ॥ बोरांच बीज मध गुळ नवनीत येकत्र करून लेप किजे वंग जाय ॥ मुखरोग तंत्र व्यथा समाप्तः ॥ १ ॥

आंबियाची सालि दाळिंबिचि सालि त्याचिव मुळि शंख चूर्ण येकत्र करूण घटि करुण मुखि धरिजे गंधि नासे ॥ जायफळ जायपत्रि मातुलिंग कुंकुम केशर कोष्ट वटि कीजे मुखि धरिजे गंधि नासे ॥ १ ॥

अथगळसुंटिस औषध ॥ हिरडे वेखंड कोष्ट मधु हळदि वोवा यानिचे दुधे वाटून पाजिजे गळसुंटि जाती ॥ १ ॥ भिजरि घायेळिया गाठी उदेजति कंठि तो रोहिणी रोग जे भिठि जिविरव मासि ते पासोन खुडिजे निस विरवे सोसिक बोखट घालिजे येन्हे प्रयत्ने वाचिडो येरवि नावरे हा रोग ॥ १ ॥ गुणळ निंबरस उन करूण गळा लेप किजे गळसुंटि जाति ॥

आतां हृदयरोग उपचार सांगेन ॥ बिबवे पिंपळमूळ काढा करूण गुळप्रति पाक दिजे हृदयरोग नासति ॥ सुंटि सविचळ हिंग दाळिंब आम्लवेतस चूर्ण करूण उष्णोदकें घेइजे हृदयरोग वेथा शमे ॥ १ ॥ पिंपळी व्याहाडेबीज नवनीते भक्षिजे श्वास कास हृदयं व्यथा वाति दारूण शमे ॥ १ ॥ गुळ मिरे हळदी रास्ना द्राक्षा पिंपळिचूर्ण करूण तेल काळऊन भक्षिजे श्वास दारूण जाय ॥ रिंगनि सैंधव जटामासि ॥ वेरागळे ॥ सविचळ त्रिकुट वेळा त्रिफळा येरंडमूळ चूर्ण करूण उष्णोदके घेइजे दारुण श्वास जाय ॥ सुंठि भारंगीचूर्ण करूण उष्णोदके दिजे श्वास जाय ॥ साकर द्राक्षे पिंपळीचूर्ण करूण उष्णोदके दिजे तेल कढउन भक्षिजे दारूण श्वास जाय ॥ सुंठि माक्षिक येकत्र करूण दिजे श्वास कास जाय ॥ काकडसिंगी ॥ त्रिकुटा त्रिफळा रिंगनिक्षार येरंडमूळ पाच हि लवणे चूर्ण किजे उष्णोदके घेइजे श्वास कास विनस जाय ॥ बाढगुळाचि सालिचि हाटिचि सालिच्या मुळया सेर १५ काढा किजे सेर १

उतरिजे मग हिरडाचूर्ण करूण त्यात घालिजे गोळिया बांधिजे निद्राकाळि तोंडि धरिजे रेवेवन जाये ॥ रुईचे फुळ सावळिये सेविजे लसन वोवा वेखंड येकत्र करूण भुरका करूण गुळासि बोर प्रमाण वटिकाटि किजे भक्षिजे खोकला जाय ॥ १॥ जांबुळि आंबा आलेसि सेविय ॥ बोरि बाबुळिचि अंत्र साळीचा भुरका किजे आडोळशाचा रस आलेरस पावशेर आत भुरका घालून दीजे पथ्य सोजि तूप दिजे महारेवेन रोग जाय ॥ हस्ती गाय येकवर्णि उष्ट्र अजा ह्मैस नर याह्माचि मुत्रे येक येक घेइजे गेळ घोर १ हिरडा टाक ०००१ वळकंटि ००० येक रांधिजे उत येतिल मग उतरिजे वाखद वाळवून मग भुरका किजे मिरे ००।- घालिजे गोळिया किजे खोकला खास जाय ॥ नसदिजे धुर जाय ॥ ताम्रभस्म टाक ६ काथ काकडसिंगी आकळकाढा भारंगि हिंग कोळांजन बाफळि कोष्ट त्रिकुट सैंधव अतिवीख येकयेक टाक ००३ भुरका करूण आडोळसा याचा भावना गोमुत्र उष्ट्रमुत्र याचा भावना ३ देउन टाक वडि बांधिजे सेविजे रेवेन खोकला जाय ॥ १ ॥ पेटारिचि मुळी दाढि धरिजे हिंगनाच्या पाल्याचा रस हिंग मिरे सिदिजे खोकला जाय उभळि जाय बळस पडति ॥ आडुळसा रिंगनीमूळ हेटियाचि फुले बोरिचे हिरडे वाबुळिचि साळि आळे नागवेलीचि पाने कारिचिपान सेउगे सालिये अवघि येकवाट करूण वरंडपात्र बांधुनि पुट करित बाफळि कोरांजन कटुफळ काकडसिंगि आकळकाढा कचोरा लवंगा काथ कापुर कंकोल मिरे रेनुका त्रिफळा त्रिकुटा हिरडा बेहाडा रिंगनि-बीज दोरलीबीज येकत्र भुरकावन्हिळपुट पाक असे येकत्र वाटून गोळिया बांधिजे सहदासि घेत जाइजे क्षयो जाये खोकला जाये ताप जाये पिकले उंबर पिकळ सेवन आडोळसीयाचि फुले रस आवळकंठि यास येकत्र करुण खांडे मधासि दिजे तोंडा वाटा रक्त पडत असेल ते राहे ॥ आडोळसायाचा रस मध सेविजे खोकला शमे ॥ डोळबियाचि फोडि पाणिये वाटुन दिजे पाटिस तेल लाऊन उन्हात बैसविजे खोकालि याचि पिसवि पडे ॥ उतरनीचि फुले २४ मिरे २४ दिजे खोकला शमे ॥ वाळयाचा रस टाक १ आतबोळ वाल १ घालुन दिजे श्वास जाये ॥ कडु दुधिगा कोरूण आत वैरागडे मीठ घालून टाक ०००१ अधर बांधिजे हाक्त वीत जाईजे दिन ७ असोदि जे मग तो रस घेत जाइजे अंतर श्वास जाय ॥ १ ॥ बहुळा चूर्ण करून मदसी दिजे ०००३ श्वास जाय ॥ काकडाबोळ गाईचे दुधासि दिजे श्वास जाय पुष्ट होय ॥ तिळाच्यामुळयाचा काढा गाईचे दुधा रांधिजे घत्य हि दिजे खैन जाय ॥ १ ॥ बिबवे २ चनियाचि दाळि सुठि येकत्र प्रतिदिन दिजे खैन जाये ॥ खोकल्याचि पिसवी पडे ॥ रिंगनीचि कोवळी फुले आणोन कांडुन कुट करून त्यात वोखद घालून त्रिकुटा काष्ठकोळांजन बाळळी आळे हूतके घालुन शेळिच्या मुत्राच्या

भावना ७ देऊन गोळिया बांधने दोहि सांजि सेवन खोकला श्वास जाय ॥ उत्तरनीचि फुले निगुडीचि पान येकत्र करूण भुरका झैसि मुत्रे प्रातःकाळि घेइजे उन्हाळु पान्हाळु होये ॥ पथ्य मुगाचे वरण दिजे असे दिवस घेइजे खोकला श्वास जाये ॥ १ ॥ गंगावतीचा रस मिरे प्रति पाके दिजे खोकला जाये ॥ १ ॥ काकड सिंगी त्रिकुट वाळाळि कटु फळ कोष्ट धामासा हे चूर्ण आले रसासि दिजे बळ सुरडे उर मोकळा होये ॥ सुंठि तरवडि झामुळयाचि साळिचा रस ८८८६ टकन वाळ २ दिजे अदित जाये ॥ येरंडढिरिया रुयिचयाढिरिया वाटुन सितळ उदके दिजे अदित श्वास जाये ॥ चण्याचि दाळ रुचिके भिजाविजे मग डाळ निबरसे भिजविजे मग वाटून टाक दिजे श्वास जाय ॥ रिंगनीरस ८८८२ गुळवेळी रस ८८८२ सुंठिरस ८८८२ येरंडमूळ रस ८८८२ तूप ८८८४ घालून कढविजे तूप उरले मग उतरिजे ते घेविजे श्वास जाय ॥ वाळा नरमुळि पाचा काढा किजे मिरे प्रतिपाके दिजे खोकला जाय ॥ १ ॥ डोरलीच बीज रिंगनीच बीज गुगुळ पिंपळी चूर्ण दिजे अदित जाये ॥ छ ॥ त्रिफळा टाक ९ काथ ८८।० आघाडेबीज कोळांजन भारंगी बाफळी टाक ८८८९ येकत्र चूर्ण किजे निर्गुडी रसाचि भावना १ देउन प्रमाण टाक १ घटिका किजे सेविजे अंबील राइतेल वर्जिजे खोकला उभळ शमे ॥ पिंपळी डोरलीयाचा रस आडुळसा पाचा रस कांडवेळिचा रस ८८।० अनुपान हिरडा भद्रमुस्ता कोकन काथ भुरका घालुन दिजे खोकला जाये ॥ पिंपळमूळ आतिविख भारंगी काकडसिंगी येकत्र करूण घेविजे मुळी दाढे धरिजे कोरडी उभळी शमे ॥ मिरे ८८।० निगुडी रस ८८१। येकत्र रस आटे नव रांधिजे मग मिरे काढोन भुरका किजे मद्देसि घेत जाइजे दारुण खोकला उभळी शमे ॥ इति खोकला श्वास प्रकर्ण समाप्त ॥

आता वांति उपचार सांगेन ॥ पत्रज लाह्या भद्रमुस्ता बोरीच बीज चंदन दारुहळदि चूर्ण मद्देसि दिजे वात वोकारि शमे ॥ १ ॥ जायपत्री पिंपळी मिरे साकर मद्द येकत्र करुण दिजे वांति शमे ॥ कावळीच्या गुळपाचा रस मद्द येकत्र करूण देणे वांति शमे ॥ १ ॥ साकर गुळवेली रस मद्द जायफळ दिजे वांति वोकारि शमे ॥ छ ॥ क्याहाड्याचे बीज साळिपाच्या लाह्या हळदि पिंपळी मद्द येकत्र करुण दिजे वांति शमे ॥ १ ॥ नागकेसर लवंगा मद्द कविठ मीरे पिकले बेल मनसीळ पिंपळि वेळा येकत्र करुण दिजे वांति शमे ॥ १ ॥ बोळ काथ करुण आंत मद्द साकर घालुन दिजे वांति शमे ॥ हिरडा चूर्ण करूण मद्देसी दिजे वांति शमे ॥ बोविपाचा काढा मद्देसि दिजे वांति शमे ॥ इति वांति प्रकरण समाप्तः ॥

उचकि शमना ॥ मद काकडपिंपळि सुंठि गुळ येकत्र करूण दिजे उचकी शमे ॥ माहोळिंगी रस साळीच्या लाह्याचे पीठ धुते येकत्र करुण दिजे उचकी शमे ॥ मासिचि विष्टा घरुण नस दिजे उचकी शमे ॥ कोष्ट जिराद्दृत येकत्र करुण पिजे उचकी शमे ॥ इति उचकी प्रकर्ण समाप्तः ॥

अथ उदरवेथा प्रकर्ण सांगेन ॥ गाईचे दूध येरंडाच मूळ समभागे लसूण वाटुन दिजे शूळ शमे ॥ कमळ फळ तांदुळाचे धुवनिये वाटुन दिजे पाठशूळ शमे ॥ बाहुळयाचा लाकुडाची सालि पांजऱ्याचा रस दिजे पोटशूळ शमे ॥ उनळीमूळ कांजिये वाटुन दिजे पोटशूळ जाय ॥ १ ॥ हिंग वेखंड सविचळ इंद्रजव येरंड अतिविख हिरडे दिजे परम शूळ शमे ॥ १ ॥ सागरगोट्या लसन हिंग सैंधव एकत्र करूण दिजे पोट शूळ शमे ॥ छ ॥ अस्वंदमूळसालि रुद्रमूळसालि एकत्र कांजिये वाटुन दिजे शूळ शमे ॥ १ ॥ ओंघळयाचा खार चूना सेर कुंडखारु सेर हे अवघे एकत्र काळऊन रोटि किजे गजपुठे दिजे निवाळया काढिजे वस्त्रगाळीत किजे ताकासि घेईजे वातशूळ वातगुल्म अजीर्ण नासे साहादेवीचे मूळ कांजिये वाटुन नस दिजे वातशूळ नासे ॥ मांदाराचे मूळ चूर्ण करुण मधासि दिजे वातशूळ नासे ॥ महाळिंगाचा रस सैंधव प्रतिपाके दिजे शूळ सर्व नासे । चिंचेचे टोकराचा खारु किजे उष्णोदके दिजे परनाम सूळ शमे ॥ तांबोळवटिचे मूळ वाटुन दिजे शूळ शमे ॥ शंखचूर्ण करूण वैरागडे हिंग सुंठि मिरे पिंपळीचूर्ण उष्णोदके दिजे शूळ नासे ॥ जवखार कवडेविख सैंधव सुंठि मिरे पिंपळिपारा गंधक घ्रावळी कमळाची कंद हेमबीज कोष्ट समभाग चूर्ण किजे नागवेलिरस भावना ७ दिजे मच्छ पित्ते भावना दिजे मात्रा गुज दिजे शूळ नासे ॥ विष भाग २ पारा भाग ८ गंधक भाग ८ चिंचा खारु भाग १२ पाचहि लोन भाग ३० लोनार खार भाग ६ शंख निंबरसामध्यें ताऊन विज विजे वेळा ७ ते शंख भस्म भाग १२ एक निंब रसे मार्दिजे त्रीकूट भाग १८ हिंगभाग ४ ऐसे एकत्र करूण मार्दिजे सेविजे मात्रा टाक १ दिजे सुळ गुल्म अशी माघे फिटे ॥ इति शंख वटिका ॥ गंध भाग १ ताम्रभस्म भाग हिंग सुंठ मिरे वेखंड आह्राळी व पिंपळमूळ हिरडे जिरे २ घोडगे मूळ आम्लवेतस लसन टाकनखार लोनखार जवखार तिटुंबि लवंगा चित्रक सुरन हस्तकंद कांडवेलि कंडमोडि पाचहि लवण येकत्र करुण भावना देन लिंबरसे माकेरसे ७ नारागिरसे ७ माहोळिंगी रसे भावना दिजे वढि ब्याहाडा प्रमाण वटिका किजे प्रातःकाळी सेविजे दारून शूळ कर्मज शूळ वात शूळ खोकला इतकि शमें ॥ इति नागार्जुन रस समाप्तः ॥

येरंडेल हिंग कुढि पाढून देने त्रिदोषशूळ नाशे ॥ १ ॥ गुळवेकी रस

मिरेसि दिजे शूळ शमे ॥ विडियाचि पान कुंकु येकत्र करुण देने सूळ नासे ॥ हिंग सैंधव वोविंयाचा क्षार येकत्र करुण घेइजे येरंडेळ तेलासि सूळ नासे ॥ हिंग सविचळ सुंठि चूर्ण करुण उष्णोदके घेइजे सित्र शूळ शमे ॥ येरंडमूळ चित्रकमुळिचि त्वचा घेटुळि कुंडक्षार हिंग उष्णोदके घेइजे परंनाम शूळ सर्वशूळ शमे ॥ लोहकीट सेर १ काळाबोळ सेर १ सागि सेर १ येकत्र करुण अजामुत्र भावना ३ निंबुरस भावना ३ बोर प्रमाण वटिका किजे सेविजे येहा गुल्म शूळ नासे १ त्रिकुट भाग १ हिंग भाग १ सुरण भाग १ विषभाग १ निवडिंग चित्रक भावना देऊन रुचिक भावना देउन वाळविजे मग भाग १६ करुन कोरूण ध्यातु भरिजे मोहर करुण मातिकापड दिजे आगरा रांधिजे मग माति फेडुन सुरनासहित वाटिजे बोर प्रमाण वटिका किजे तुपासि दिजे सर्व गुल्म सर्व प्याहा सर्व उदर शूळ जाये १ गोमुत्र ८८५ निवडिंग चिक सेर ८८५ तेळ ८८२॥ येकत्र किजे गुल्मोदारि पायावारि उदराचे पीठाचि पाळि किजे तेळ तेथें घालिजे लोखंड ताउन तेथ विझविजे सेकळागे तव किजे मग शुधिच उतरिजे तेळ काढिजे ऐसे मास १ किजे प्याहा गुल्म उदर दोष फिटाते ॥ कणिक ८८१ वैरागडे-मीठ विखटे भुरनीचे बीज येकत्र करूण निवडिंग चिक भिजविजे जाळून क्षारु किजे तो क्षार टाक १ कांजियेसि दिजे पथ्य तांदुळाचे भळवणी दिजे आंबट वर्जिजे प्याहा नाशे ॥ रुइंचे पान वैरागडे मीठ बरोबरि मडक घालिजे तोंडि मोहर करूण भुळीवरि ठेऊन जाळुन क्षारू किजे तो क्षारू दहियाचा पाणिसि दिजे पथ्य तांदूळाच भळवणि प्याहा नासे ॥ सेउरपाचा काढा पिंपळी मिरे सैंधव आम्लवेतस द्रवके घाळून दिजे प्याहा नासे ॥ पिंपळिचूर्ण दुधासि दिजे प्याहा नासे ॥ चित्रकसाळि सैंधव चूर्ण करूण ताकासि दिजे वातोदर नासे ॥ गोमुत्र मद हिरडा ध्याहाडा येकत्र करूण दिजे जळोदर नासे १ कटकी रोहिनी मूळ सैंधव येरंड तेळ पिंपळी गोमुत्र येकत्र करूण दिजे जळोदर नासे ॥ त्रिकुटा टाक ८८८१ हिंग ८८८३ पाचही लवण ८८८७ चित्रकसाळि ८८८३ निवडिंग चिके भिजविजे सुरन कोरून आत घालिजे पुट दिजे काढाडिजे येक ८८८६ खाइजे घामुळ सहासेळ उसवण वग कडा जाये ॥ १ ॥

हिरडा पुननंवा देवदार गुळवेळी गुगुळ येकत्र करूण गोमुत्रासि दिजे पंडुरोग जळोदर नासे ॥ निळसवी धव चित्रक सैंधव वैरागडे जवक्षार कटु त्रय येकत्र चूर्ण करूण गाइंचा तुपासि भक्षिजे सर्वोदर गुल्म इत्यादि नासे ॥ पिंपळीस निवडिंगाचि काचा भावना दिजे २१ वाळविजे चूर्ण साकरेसी दिजे सर्व गुल्म जाये ॥ चित्रक मूळ साळिचा पळे १०० हिरडे चुर्ण पळे ६९

गुळवेली पळे येकत्र कढविजे सेउपात तज पत्र वेळा जवखार सर्व पळ १२ चूर्ण घालुनि मद पाक पाके पचीजे गोळि ढयाहाडे प्रमाण अथवा कळक टाक ३ सेविजे पाणि लागल असल असेल पाट जळ जळे करीत असे ते जाय ॥ मंदाग्नि पांडु फिटे ॥ अर्कक्षार चिंचक्षार हळदी ब्रह्मदोडिचूर्ण करूण सेविजे सेळिचे मूत्राखि घ्याहा गुल्म नासे ॥ रुईची साळिसे ३ गेसाळी धोरतसाळी पिंपळाचि साळि सेपा हळदि तिखाडि पाट गेरू वेखंड कोष्ट राइ आहाळीव विहसा काळा बोळ बांगरखार लसन कारिची पान बिबवे देवदार येकत्र कांजिये वाटून लेप किजे घट फुटे नळ वितळति ॥ १ ॥ कोहळयाचा रस मुळयाचा रस सेउगे रस हिंगण साळिरस आलेरस निंबरस येकत्र करून पोटात दिजे घटनळ वितळति ॥ पिंपळयाचा डिरिया बोळ सागरगोटीयाचा डिरिया येकत्र करूण दिजे नळ वितळति गाठिहि वैसे ॥ कुमारि हस्तकंदु कोहळीवेल कळलावि कंदु हिंगणसाळि चित्रक देवडांगरि इंद्रावनिसमुळी सुरन अर्क पत्र पिकळि निवडिंग उतरनि तिळवनी आघाडा टाकळि गांधवी वेखंड हिरडे कळिचि सोपे पळस पापडा रक्तरोहिडा सेउगीसाळि ब्रह्मराक्षस चाकवताचाडिरिया विष दोडि मुहु व्याकरमोडि लसन कोंढवेळि झेसवेल आहाळीव विखटे भुरनींच्या ढ्या इतुकीसमुळी सपत्री मडका घालिजे तोंडि मोहर करुण खारु बरवा किजे वस्त्रगाळीत किजे धातु वोखद घालिजे त्रिकुट पाच लवण जवखार साजीखार कुंढखार इतुके चतुर्थांश मेळउन येकत्र कीजे ताकेसि अथवा निरंसेसि घेइजे शुळवात शुळगुल्म घ्याहा मंदाग्नी इतुके जाये ॥ इति चतुर्मुखखार उदर वेथा प्रकर्ण समाप्तः ॥

अथ क्रिमि उपचार सांगेन ॥ निंबोळी बीज अजमोदा कांजिये वाटून कांजियेसि दिजे क्रिमि पडतील ॥ अजमोदा चोखोवा सैंधव वावडिंग सवीचळ हिंग सागरगोट्या वेखंड सुंठि कोष्ट हिरे चित्रक पागरेसाळि पिंपळि लसन उंबरफळस पापडा डिकिमाळि मोहेळिंग रस मर्दुन वटि किजे वरि चूळ ताके भक्षिजे क्रिमि शमति ॥ पळस बीज चोरवोवा सीळवनीये अथवा गुळसि दिजे क्रिमि पडतील ॥ पांगरेचा रस टाक १२ मदसी दीजे क्रिमि पडति ॥ पळसबीज पळस रसे अथवा मदासी दिजे क्रिमि पडति ॥ घने निंबकारियाचा रवोवा भुइनिंब काढा मद साकरेसी दिजे ऊर्ध्व जंत क्रिमि खाळि पडति ॥ इति क्रिमि उपचार समाप्तः ॥

अथ इगवनीचा उपचार ॥ असवंद रस मदासि दिजे स्तुराहे ॥ आडळसी याचा रस मदासी दिजे रक्त राहे ॥ पोहेचा रस अजमोदा राळ धाय फूल सुंठि जायफळ सम भाग चूर्ण करुण देने संग्रहणी शमे ॥ बाबळेच्या डिरियासि लवण वाटुन देणे संग्रहणी शमे । दाळिंबफळ जिजे ताके वाटून दिजे रक्त

राहे ॥ बज्रमुळी दहियासि दिजे हगवन राहे ॥ पोस्त जायफळ सुंठि पाणियासि दिजे हागवन जाये ॥ रक्त थांबे ॥ कोळसा बीज ८८८३ राळ बस्तगाळीत किजे गाइचे दुधासि दिजे रक्त राहे ॥ धावडि याचि साळि काय दहियासि दिजे रक्त राहे ॥ वेखंडाचि मसि निंबात घालून दिजे रक्त राहे ॥ तिळवनीचि पाने ७ मिरे ७ पानियेसि दिजे रक्त थांबे ॥ जायफळ अर्ध हिरव अर्ध भाजळ मद्यासि दिजे रक्त राहे ॥ बिबवेटाक १ मेथि पाव टाक हिंग टाक ॥ सुंठि टाक १ इतुके तुपाचा भांडा घालून मवागि कढवजे बिबव्याचे तेळ वोखदास जिरे ऐसे किजे ते वोखद टाक १ चूर्ण दहियासी दिजे हगवन मुरडा राहे ॥ मोहाचा डिंग दिजे हगवन राहे ॥ तुपटीवरा दिजे संग्रहणी जाये १ वडाच्या पारंब्याचा काढा तुपप्रति पाके दिजे हगवन राहे ॥ आकोळ मुळाचे चूर्ण करूनटाक तांदुळाचे धुवनेसी दीजे संग्रहणी रक्त राहे ॥ अतिसार वमे ॥ घेट्टाळमूळ मेढसिंगचूर्ण करूण देने मेंढिचे दुधेसि संग्रहणी जाय ॥ काळामुळा वेखंड मदसी चूर्ण करूण निंबासे दिजे संग्रहणी रक्त राहे ॥ विपळापरि ताकासि दिजे मुरडा राहे ॥ सुंठि वैरागडे मीठ करणीकरूण ताकासि दिजे आव मुरडा राहे ॥ रानद्राक्षेयाचि मुळि वासनेचि मुळि गाइचे दुधासि दिजे हागवन राहे ॥ १ ॥ मोहाचि अंतरसाळ दुधासि दिजे रक्त राहे ॥ भद्रमुस्ता पिकळे केळ कुडाचून दिजे अतिसार नासे ॥ हिरडा हिंग तुपांत तळून मिठाचा रज वाटून दह्यासी दीजे हगवन राहे ॥ जायफळ मोठे कोरून आत अहिफेटा ८८८॥ घालून वरि कनकिने लेप करूण कनीक जळे तो वर पाकिजे मग फोडून जायेफळाचा मुरका कीजे यात सुंठ टाक ४॥ हेहि अर्धी हिरवी अर्धी भाजळा हिंग ८८८॥ येकत्र चूर्ण कुडि पाकुन तूप तळउन दिजे पथ्य तूर भात चळवळीत दिजे रक्त राहे अतिसार थाने ॥ राळ भाग साकर दिजे अतिसार थामे ॥ आंबि अंतरसाळ वाटून वरि चुना घालून दिजे हगवन रक्त थांबे ॥

कड्यास उपाय ॥ सागि उगाळून कढिस लाविजे भितरि दडपिजे वरि थोडा दिजे ऱ्हानिवेळ तेऱ्हा ऐसेचि किजे स्वरळानि बसे ॥ कोष्ट मिरे हिंग विसजिरे काळा बोळ विखटें भुरनीबीज पारवी याचि विष्टा वृद्ध भागे मेळवीजे निंबरसे कढिस माखून माखु वरि निंबोटि देऊन वरि कासोटि दिजे दिन ७ किजे बहुत दिवसाचि कढि निघत असेल ते बैसे ॥ सुख साध्य चमत्कार कडी निघालि अस तेथ बिब्याचे तेल लाविजे दडपून भीतरी घालिजे वरि भोटा दिजे स्वस्थानि बैसे ॥ बोरिची अंत्रसाळी बाभुळीचि अंत्रसाळि आत्रो मडका घालिजे मद तांदुळ साळिवरि घालिजे उदक घालोन यापरि तांदळा रांधिजे गाइचे ताकासि दिजे

अतिसार संग्रहणी शमे ॥ भद्रमुस्ता उष्ण उदके चूर्ण करून दिजे आमशूळ ज्वर बहुतादिवसाचा अतिसार नासे ॥ कुडियाचि साळि गाइचे दुधासि दिजे अतिसार शमे ॥ कोथंबरि बाळबेल सुंठि वाळा भद्रमुस्ता हा कढविजे अतिसार ज्वर नासे ॥ येऱ्हउदके पथ्य दिजे रांधुन ॥ वय मुरडा आवरक्त राहे ॥ सुंठि मोचरस अजमोदा बायफळ ताके वाटून दिजे विसुचिका हागवन राहे ॥ सुंठि मुस्ता कुडे साळि अतिविख सम भाग चूर्ण करूण गुळवेलीचा काढा करूण त्यांत अनुपान हें चूर्ण घालोन टाक दिजे अतिसार ज्वर भळता शमे ॥ मीठ वैरागडे सैंधव चवीचळ जवखार बोवा अजमोदा हिंग वावडिंग चित्रक हिरडा मिरे पिंपळी येकत्र करूण चूर्ण कीजे जेविता पहिले घास पांच चूर्ण घालून तुपे काळउन भक्षिजे जेविजे अतिसार शमे ॥

अथरीस प्रकर्ण ॥ गुदीस अंकूर वाढती ते अरीस ह्मणौजति येक रक्त श्रवति येक विष्टंभिये तेसर कोवळे सावळे वात लक्षणि श्रवतीस चोपड दाट श्थेमी चिकंट सर्व लक्षणी पातुळे बहु श्रवति रक्त ते कष्ट साध्य ॥ विष्टंभीयासी घेण रेचक वात सामक स्नवि पीनक रुचि प्रदावो वा ताक सेविजे विष्टंभ समे ॥ चाकवत सुरण शाक कीजे कोकमाची पान वाटून गुदि लेप किजे ढवढांगरीच्यापानाची गुदिवरि बैसवीजे ढवढांगरि उदके श्रोतांजन किजे अंकुर शमति मळशुद्ध होईल गोळी सुइजे सराटे मुळाची खीर सेळिचे दुधामधे रांधिजे मग खलून गघ्याने चारि प्रतिदिनि सेविजे साकरेसीस्तु अतिसार शमे ॥ रिशे श्रवति रक्त धाराते बनव्हे सर्वथा येर रोग करिती सर्वथा ॥ मिरे सुंठि चित्रक सुरणा याचा दशगुणा माका सैधव भाग विसण किजे गध्याने सेविजेता कासि विष्टंभियासि नासि ॥ अग्निमांद्याचि सोये राहो नेदि ॥ १ ॥ हृदई वाता गुदी दुखेति सुजि ज्वरु बाधितो असाध्य ॥ इंद्रावनिमूळ जाळून भस्म कीजे गाइचे तुपे मध्ये कढउन गुदि लाविजे रिशे कोंब शमति ॥ तिकनीचा कडु वाटुन गोळि तुपासि गिळिजे रिसे गळून पडतील ॥ दातिच मूळ लोणारखार येरंड पाणि लाविजे रिसे गळून पडतील ॥ कोकुंब कोराटा पंचाग घेइजे साउलीत वाळविजे गोमुत्र भावना दिजे सावलीत वाळविजे चूर्ण किजे त्यांत वोखद मेळविजे त्रिकटु त्रिफळा चूर्ण करूण वरील भुरका व हे येकत्र करूण सम भागे साकर घालिजे प्रत्यहि टाक १ घेत जाइजे मूळव्याधि जाय ॥ पांजरपाचापळा वैरागडे मीठ वाटिजे गुदी लेप किजे वाटा सुबद्धदीजे ॥ इट ताइजे वदि रगट घालिजे वरि बैसवीजे रिशे जाति ॥ करकेसि हेचि वोखद गुदीस कडु असे वोढा सुबुद्ध दिजे ॥ १ ॥ डिक माजिस्रा ८८१ वोवा ८८१ सुंठि लवंगा ८८८९ जायफळ मायफळ ८८१ चिराईत ८८८२ जिरे ८८८१ चूर्ण करूण गुळ ८८१ पाकदिजे ३१ सेविजे श्रावक रिशे जाति ॥ बाळरेळ जिरे सोपा